जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 SEP 2021

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची पुनर्परीक्षा सुरू

## पहिल्या दिवशी २९७२ परीक्षार्थी : बारावीच्या पुरवणी परीक्षेला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : तांत्रिक आणि अन्य काही अडचणींमुळे ज्या विद्यार्थ्यांना उन्हाळी सत्रातील (मार्च/एप्रिल २०२१) परीक्षा देता आली नाही. अशा विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा गुरुवारपासून शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत सुरू झाली. पहिल्या दिवशी नियमित आणि पुनर्परीक्षार्थी असणाऱ्या २९७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा मंडळाने विविध ३२ परीक्षांचे निकाल ऑनलाईन जाहीर केले.

बी. एससी. एम. एससी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) यासह विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी ३१६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २९७२ जणांनी परीक्षा दिली. एम. एससी. प्राणीशास्त्र, ऑरगॅनिक केमिस्ट्री, इतिहास, गृहशास्त्र, भाषा प्रायोगिकी, बी. ए. मल्टीमिडिया, एम. कॉम., एम. ए. समाजशास्त्र, मानसशास्त्र (सत्र तीन व चार), बी. व्होक इन फूड प्रोसिसिंग अँड मॅनेजमेंट (सत्र चार), पी. जी. डिप्लोमा इन जीओइन्फरमेटिक्स, बी. आर्किटेक्ट (सत्र एक, तीन, पाच, सहा आणि सात), डिप्लोमा इन इन्कम टॅक्स-अंडर फॅकल्टी ऑफ लॉ, बी. टेक (सत्र एक ते चार) या अभ्यासक्रमांचा निकाल गुरूवारी ऑनलाईन जाहीर झाला.

दरम्यान, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून १२वीची पुरवणी परीक्षा गुरूवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाचा ऑफलाईन पेपर झाला. कोल्हापुरात दहा केंद्रे आहेत. कोरोना नियमांचे पालन करत परीक्षा घेतली असल्याचे विभागीय सचिव देविदास कुलाळ यांनी सांगितले.



### महापुरात खराब झालेली प्रमाणपत्रे पुन्हा मिळणार

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महापुरामुळे शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांचे नुकसान झाले आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार महापुराने खराब झालेली प्रमाणपत्रे, कागदपत्रे विद्यार्थ्यांना विनामूल्य उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

लोकमत

# 'दूरशिक्षण'ची करिअर व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठी आयोजित ऑनलाईन करिअर मार्गदर्शन व्याख्यानमाला गुरूवारी सुरू झाली. दि. ३० सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या व्याख्यानमालेत करिअर आणि रोजगाराच्या संधीबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार असल्याची माहिती या केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली. या व्याख्यानमालेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, भाषांतर, एम.बी.ए., आदी अभ्यासक्रमातील रोजगाराच्या संधी विषयावर डॉ. हिमांशु स्मार्त, मुकुल जोशी, श्रीकृष्ण महाजन, बी. डी. पाटील, यु. एच. नाईक, शिवाजी पाटील, अनिल गवळी, राजेंद्र पारिजात, महेश जोशी, भारतभुषण माळी, आनंद गाडीवड्डु, व्ही. बी. ककडे, बी. एम. हिर्डेकर मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. ए. एम. सरवदे यांनी केले.

17 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांच्या शैक्षणिक सत्राचा लवकरच श्रीगणेशा

## ऑक्टोबरमध्ये पारंपरिक, नोव्हेंबरला व्यावसायिक अभ्यासक्रम

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ संलग्नित पारंपरिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालयांच्या नवीन शैक्षणिक सत्राचा 'श्रीगणेशा' ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये होणार आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठाने तयारी सुरू केली आहे. मात्र, महाविद्यालये ऑनलाईन की ऑफलाईन याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

पुढारी विशेष

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे बंद महाविद्यालये कधी सुरू होणार असा प्रश्न विद्यार्थी, पालकांना पडला आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी २ नोव्हेंबरपासून महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा केली आहे. विद्यापीठाने पदवी-पदव्युत्तर सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा नुकत्याच जाहीर केल्या आहेत. त्यानुसार विविध अभ्यासक्रमांचा १ ऑक्टोबरपासून प्रथम सत्रारंभ होणार आहे.

पान २ वर ▸



**विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांची संख्या**

| | |
|---|---|
| कला, वाणिज्य, विज्ञान (पारंपरिक महाविद्यालये) | 185 |
| अभियांत्रिकी व आर्किटेक्चर महाविद्यालये | 27 |
| औषध निर्माणशास्त्र (फार्मसी) महाविद्यालये | 16 |
| शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये | 40 |
| व्यवस्थापन (मॅनेजमेंट) महाविद्यालये | 16 |
| बीबीए, बीसीए, एमसीए, बीएसडब्ल्यू, एमएसडब्ल्यू | 04 |
| बी.व्होक अभ्यासक्रम असलेली महाविद्यालये | 18 |
| विधी (लॉ) महाविद्यालये | 07 |

“

महाविद्यालये सुरू करण्याबाबत नियोजन सुरू झाले आहे. यूजीसी व राज्य शासनाच्या निर्देशानुसार १ ऑक्टोबरपासून नवीन शैक्षणिक सत्रास प्रारंभ होईल. व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये सीईटी परीक्षा झाल्यानंतर नोव्हेंबरमध्ये सुरू होतील.

**– डॉ. डी.टी.शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

ऑक्टोबरपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरु होत असून काही गोष्टी स्पष्ट नाहीत. गेल्या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेच्या प्रात्यक्षिकांचे कामकाज समाधानकारक झालेले नाही. शासनाने सर्व नियमांच्या अधिन राहून ऑफलाईन महाविद्यालये सुरू केल्यास बरेच प्रश्न सुटतील.

**– डॉ. आर. आर. कुंभार**, प्राचार्य, विवेकानंद कॉलेज

पुढारी

# महाविद्यालयांच्या शैक्षणिक सत्राचा लवकरच श्रीगणेशा

(पान १ वरून) सध्या बीए., बी.कॉम., बी.एस्सी. प्रथम वर्षाची महाविद्यालयस्तरावरील प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठ, महाविद्यालयातील पदव्युत्तर अधिविभागाच्या प्रवेशासाठीच्या २९ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा झाल्या आहेत. लवकरच गुणवत्ता यादी जाहीर होऊन प्रत्यक्ष प्रवेश सुरू होतील. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने १५ व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले असून, १५ सप्टेंबरपासून परीक्षांना प्रारंभ झाला आहे. यात प्रथम वर्षाच्या सुमारे ८० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ऑक्टोबर १० तारखेपर्यंत विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा चालतील. त्यानंतर प्रत्यक्षात प्रवेश प्रक्रिया सुरू होईल.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात २७६ महाविद्यालये असून विद्यार्थी संख्या २ लाख ४० हजार आहे. अनुदानित पारंपरिक (१२६), व्यावसायिक (१५) महाविद्यालये आहेत. विनाअनुदानित पारंपरिक (६१), व्यावसायिक (७७) महाविद्यालये आहेत. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व आर्किटेक्चरची २१ महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात समाविष्ट झाली आहेत. विद्यापीठाने सांगली, सातारा व कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून विद्यार्थी वसतिगृह ताब्यात देण्याची मागणी केली. त्यानुसार काही वसतिगृहे ताब्यात दिली आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाबाबत महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

पुढारी

# बी.एस्सी., एम.एस्सी.च्या परीक्षा सुरळीतपणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च-एप्रिल २०२१ च्या परीक्षांना ऑनलाईन पद्धतीने प्रारंभ झाला आहे. गुरुवारी बी.एस्सी., एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमाची परीक्षा सुरळीतपणे झाली.

पुनर्रपरीक्षा १६ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे. नियमित व पुनर्परीक्षा मिळून ३१६२ पैकी २९७२ विद्यार्थी परीक्षेला बसले. परीक्षा न झालेल्या विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

पुढारी

# पालकांनी बदलत्या भूमिका लक्षात घेणे गरजेचे : डॉ. के. बी. पाटील

कोल्हापूर : कोव्हिड-१९ काळात शिक्षण क्षेत्रासमोर पर्यायाने शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. अनिश्चित काळाच्या संकटाला सामोरे जात असताना प्रत्येक घटकाने काळजीपूर्वक विद्यार्थ्यांना हाताळले पाहिजे. यात पालकांची आजची भूमिका बदलत असून त्यांनी पाल्याचे केवळ पालक म्हणून जबाबदारी पार न पडत शिक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे मत डॉ. के. बी. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांचे सयुंक्त विद्यमाने 'कोव्हिड काळातील विद्यार्थी व पालक यांचे समोरील आव्हाने व उपाय योजना' या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते. याप्रसंगी विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांची उपस्थिती होती. अतुल ऐतवाडेकर यांनी स्वागत केले. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

17 SEP 2021


पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारात भांडवलापेक्षा माणूस महत्त्वाचा : ककडे

**नेसरी : वार्ताहर**

कार्पोरेट कंपन्यांमध्ये भांडवल महत्त्वाचे आहे, तर सहकारात भांडवलापेक्षा माणूस महत्त्वाचा आहे. सभासद आणि ठेवीदार, ग्राहकांचे हित केंद्रस्थानी ठेवून वाटचाल केली तरच सहकारी संस्था मोठ्या होऊन नावारूपाला येतात, असे विचार अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले.



**नेसरी : रवळनाथच्या प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. ए. एम. गुरव. शेजारी एम. एल. चौगुले, डॉ. विजय ककडे, ॲड. गडगे व अन्य.**

नेसरी (ता. गडहिंग्लज) येथे रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीमार्फत आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाच्या सहकार्याने ही कार्यशाळा पार पडली. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. नेसरी शाखाध्यक्ष प्राचार्य आर. बी. पाटील यांनी स्वागत केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे अध्ययन व विस्तार विभागाचे प्र. संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी संस्थेची प्रगती कायम ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली. ॲड. गडगे यांनी मल्टिस्टेट संस्था कायदा आणि कर्ज वसुली याबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणास उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, प्राचार्य आर. एस. निळपणकर, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, सीईओ डी. के. मायदेव, प्रा. डी. एम. पाटील, शमा कुरणे, एस. एस. मटकर, प्राचार्य संभाजी भांबर, जे. व्ही. निचळ, शाखाधिकारी किरण कोडोळी आदींनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

संजय कालकुंद्रीकर यांनी सूत्रसंचालन केले. शाखा सल्लागार डॉ. व्ही. के. दळवी यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# पालकांनी बदलत्या भूमिका लक्षात घेणे गरजेचे : पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना काळाच्या संकटाला सामोरे जात असताना प्रत्येक घटकाने काळजीपूर्वक विद्यार्थ्यांना हाताळले पाहिजे यामध्ये पालकांची आजची भूमिका बदलत असून त्यांनी आपल्या पाल्याचे केवळ पालक म्हणून जबाबदारी पार न पडत शिक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे मत डॉ. के. बी. पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड काळातील विद्यार्थी व पालक यांचे समोरील आव्हाने व उपाय योजना या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते. या वेळी विभागाचे संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत अतुल ऐतवाडेकर यांनी केले.

डॉ. पाटील पुढे म्हणाले , शिक्षक ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांचा वयोगट, त्यांच्या विविध क्षमता लक्षात घेऊन अध्यापन करत असतो, त्याप्रमाणे पालकांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. आज ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थी घरातच पूर्ण वेळ आहेत. अशावेळी विद्यार्थ्यांनीही आपले पालक हेच आपले शिक्षक समजून त्यांच्याकडून अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करावा. ए. एम. गुरव म्हणाले की, विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने, त्यांच्या समस्या लक्षात घेऊन पालक व शिक्षकांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ पुनर्परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १० ऑगस्टपासून पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू करण्यात आल्या होत्या. परंतु काही तांत्रिक कारणाने ८८४५ विद्यार्थी परीक्षा देवू शकले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार गुरुवारपासून पुनर्परीक्षेला प्रारंभ झाला. ३१६२ पैकी २९७२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. हॉलतिकीटवरील त्रुटी, काही भागात रेंजचा प्रश्न अशा किरकोळ त्रुटींची पूर्तता करीत ही परीक्षा सुरळीत पार पडली. बी. एस्सी., एम. एस्सी., नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या.

**विद्यापीठ अंतर्गत ३२ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या उन्हाळी परीक्षेतील ३२ अभ्यासक्रमांचे निकाल गुरुवारी जाहीर करण्यात आले. यामध्ये एम. एस्सी., एम. ए., बी. आर्किटेक्ट, एम. कॉम., बी. व्होक इन फूड प्रोसेसिंग अॅन्ड मॅनेजमेंट, बी. ए.- ड्रेस मेकिंग अॅन्ड फॅशन को-ऑर्डिनेशन, डिप्लोमा इन इन्कम टॅक्स, बी. टेक. यासह अन्य विषयांचा समावेश आहे. निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 SEP 2021
तरुण भारत

# जैन मूलतत्वे मार्गदर्शक ठरतात

## डॉ. डी. ए. पाटील : शिवाजी विद्यापीठात पर्युषण पर्व व्याख्यानमालेला प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

धर्माचा आदर्श म्हणून शांतीसागर महाराजांनी जीवनभर केलेला त्याग, तप यांचे जिवंत उदाहरण आहे. आपल्या व्याख्यान व विहारातून त्यांनी जैन धर्माची मूलभूत तत्वे समाज मनात पेरली. सध्याच्या अशांतवत दहशतवादी वातावरणात जैन मूलतत्वे ही मार्गदर्शक ठरतात, असे प्रतिपादन डी. ए. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनामार्फत आयोजित पर्युषण पर्व व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. याप्रसंगी 'जैन धर्माचे दशधर्मव आचार्य शांतीसागर यांचे कार्य' या विषयावर पाटील यांनी पहिले पुष्प गुंफले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

पाटील म्हणाले, दया, क्षमा, सत्य, संयम, तप, त्याग, ब्रह्मचर्य ही सर्व तत्वे एखाद्या फुलाच्या पाकळीप्रमाणे असून यातून तुमचे जीवनपुष्प व्यक्त होते. प्रत्येक तरुणाने ही तत्वे मार्गदर्शक म्हणून डोळयासमोर ठेवल्यास त्यातून समृध्द भारत घडू शकेल. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, क्षमा, याचना व्यवस्थापनात उपयुक्त ठरते. संयम हा महत्वाचा असून अनेक विरोधात्मक परिस्थितीत त्याचा उपयुक्त वापर होतो. प्रस्ताविक डॉ. विजय ककडे यांनी केले. यावेळी एस. डी. पाटील, श्रीधर हेरवाडे, भारती उपाध्ये, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. अनिल मडके, डॉ. दगडे, सम्मेद उपाध्ये, डॉ. सुषमा शेटे आदी उपस्थित होते.